**अपर पोलीस महासंचालक व**
**महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा**
**महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशा. इमारत, पुणे-०१**
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
igprison.pune-mh@gov.in

**परिपत्रक**

जा.क्र. शेती/वा.निर्लेखन/ ७५०९ /२०१६/कक्ष-७(शेती) पुणे-१ दि.-२६/०७/२०१६

**विषयः- कारागृहातील निरुपयोगी/बंद ट्रॅक्टर, यंत्रसामग्री, अवजारे निर्लेखनाबाबत.**

**संदर्भ** :- मुख्यालयाचे पत्र क्र.४४११, दि.२९/४/२०१५

उपरोक्त विषयान्वये कारागृहाकडील निरुपयोगी/बंद ट्रॅक्टर, यंत्रसामग्री, अवजारे निर्लेखनाबाबत वित्त विभाग शा.नि.क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/विनिमय,भाग-२, दि. १७ एप्रिल २०१५ मधील उप विभाग दोन अ.क्र. १९ क नियम क्र.६९ नुसार कार्यवाही करणेबाबत मुख्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि त्यानुसार अद्याप कारागृहांकडुन कार्यवाही प्रलंबीत आहे. विशेषतः येरवडा म.का., कोल्हापुर म.का., विसापूर खु.का., नागपूर म.का., अकोला खु.का. येथे प्रत्येकी ०१ तर पैठण खु,का. येथे ०२ बंद ट्रॅक्टर अद्याप निर्लेखित केलेले नाहीत. सबब याबाबत या परिपत्रकाव्दारे पुनःश्च खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**१.**वर नमूद नियमानुसार कार्यालय प्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीचा अवलंब करुन कारागृहाकडील ट्रॅक्टर किंवा ट्रक व इतर अवजड मोटार वाहनांचे **धाव अंतर २ लक्ष कि.मी. किंवा १० वर्षावरील वाहने** सबंधीत प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडुन वाहन दुरुस्त करुन यापुढे उपयोगात आणणे आर्थिकदृष्टया किफायतशीर राहणार नाही असे प्रमाणपत्र मिळवुन तात्काळ निर्लेखित करावे.

**२.**चालु स्थितीत असलेले ट्रॅक्टर किंवा इतर यंत्रसामग्री व अवजारांची कारागृहास गरज नसलेस इतर कारागृहास कारागृह उपमहानिरीक्षक यांचे मान्यतेने इतर कारागृहास वर्ग करावे.

**३.**जड वस्तु संग्रहातील बाबींचे देखील निर्लेखन वित्तीय नियम पुस्तिकेतील उप विभाग एक अ.क्र. २२ नियम क्र. १४६ अन्वये कार्यालय प्रमुखांनी प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीचा अवलंब करुन निर्लेखन कार्यवाही करावी.

**४.**कोणत्याही परिस्थितीत विना वापर/बंद वाहने, यंत्रसामग्री व अवजारे कारागृहाकडे पडुन राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच उक्त नियमानुसार निर्लेखनास पात्र असलेली वाहने, यंत्रसामग्री व अवजारे निर्लेखित केल्याशिवाय नवीन खरेदी प्रस्ताव मुख्यालयास सादर करु नये अन्यथा त्याची सर्वस्वी जबाबदारी अधीक्षकांची राहिल याची नोंद घ्यावी. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(डॉ.भूषण कुमार उपाध्याय)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रति,**

**अधीक्षक,मध्यवर्ती कारागृह** येरवडा, कोल्हापुर,नाशिकरोड, नागपूर, अमरावती
**जिल्हा कारागृह** धुळे, अकोला, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा, वाशिम, नंदुरबार, बुलडाणा, परभणी, उस्मानाबाद, बीड, नांदेड, सांगली, सातारा, वि.का. रत्नागीरी
**खुले कारागृह** येरवडा, पैठण, औरंगाबाद, गडचिरोली, मोर्शी, ठाणे, विसापूर, कोल्हापुर, नाशिकरोड, संपर्क अधिकारी, स्व.खु.व.आटपाडी

**प्रत :-** कारागृह उपमहानिरीक्षक **(सर्व)** विशेष पोलीस महानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांना कार्यवाहीस्तव.